# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.02.2026** **वार- शुक्रवार**

---

**स्थायीसमितीनिवड**

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीच्या सदस्यांची निवड आज घोषित करण्यात आली. 16 सदस्य असलेल्या या समितीत, संख्याबळानुसार भाजपचे 12, राष्ट्रवादीचे तीन तर काँग्रेसचा एक सदस्य आहे. भाजपतर्फे रूपाली धाडवे, कालिंदा पुंडे,, जयश्री  भुमकर, विशाल धनवडे,  रत्नमाला सातव, प्राची आल्हाट, मयुरी कोकाटे,  निशा मानवतकर, श्रीनाथ भिमाले, दादा कोद्रे, वृषाली  कामठे, संदीप बेलदरे, राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अमोल बालवडकर, वैशाली बनकर, सुहास टिंगरे  तर काँग्रेस तर्फे प्रशांत जगताप यांना संधी देण्यात आली आहे. संपूर्ण शहराचे आर्थिक विषय स्थायी समितीकडे असल्याने ही समिती महत्त्वाची मानली जाते.

**रवीलांडगे**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज यशवंतराव चव्हाण स्मृती पदव्युत्तर संस्था आणि रुग्णालयाला भेट देऊन विविध विभागांची सर्वंकष पाहणी केली. यावेळी महापौरांनी डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि प्रशासकीय कर्मचारी तसंच रुग्णांशी संवाद साधला.

**पिंपरी चिंचवड-झोपडपट्टीनिर्मुलन**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन आणि  पुनर्वसन विभागामार्फत झोपडपट्टी सेवाकर वसुलीची मोहीम सुरू असून, नागरिकांच्या सोयीसाठी विभागाचे कार्यालय साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे. सेवाकर बिलात देण्या आलेल्या क्यूआर कोडद्वारे नागरिकांना घरबसल्या ऑनलाईन स्वरूपात सेवाकर भरता येणार आहे.

**उमराणी**

विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी विविध विषयांवरील कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरतात, असं मत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर एन. एस. उमराणी यांनी व्यक्त केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचं डी. एस. सावकार अध्यासन , मॉडर्न महाविद्यालय आणि इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमानं आज  आयोजित करण्यात आलेल्या, ‘अप्रत्यक्ष करप्रणाली सुधारणा २.०’  या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेचं उद्घाटन वस्तू आणि  सेवाकर विभागाच्या सहआयुक्त डॉ. संजाली डायस यांच्या हस्ते झालं. जी एस टीतील  सुधारणांमुळे नवीन गुंतवणूक आणि  रोजगारनिर्मितीस चालना मिळेल, असं डायस याप्रसंगी बोलताना म्हणाल्या.

**शिकारपूरफौंडेशन-सायबरयोद्धे**

आज राष्ट्रीय महिला दिन आहे. स्वातंत्र्यसेनानी, कवयित्री आणि पहिल्या महिला राज्यपाल सरोजिनी नायडू यांच्या जयंतीनिमित्त १३ फेब्रुवारी हा दिवस  राष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या औचित्त्यानं, शिकारपूर सोशल फाऊंडेशन आणि एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठातर्फे आज आयोजित कार्यक्रमात, सायबर कायदेतज्ज्ञ ॲड. वैशाली भागवत, रिस्कप्रोच्या संस्थापक संचालक डॉ. अपूर्वा जोशी आणि पर्सिस्टंट सिस्टिमच्या वरिष्ठ उपाध्यक्ष शिवांगी नाडकर्णी यांचा 'महिला सायबर योद्धे' म्हणून  गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. राजेंद्र डहाळे, शिकारपूर सोशल फाऊंडेशनचे संस्थापक डॉक्टर दीपक शिकारपूर यांची प्रमुख उपस्थिती होती. सायबर

गुन्हेगारीविषयी समाजामध्ये प्रभावी जाणीवजागृती करण्याची गरज आहे असं डॉक्टर डहाळे यावेळी बोलताना म्हणाले.

**<u>मुठानदी</u>**

मुठा नदीचं संवर्धन आणि पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'वर्शिप अर्थ फाउंडेशन' तर्फे राबविण्यात येणारा ‘माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन’  हा उपक्रम उद्या, १४ फेब्रुवारीला सकाळी ७ वाजता भिडे पूल परिसरातील मुठा नदी पात्रात राबवला जाणार आहे. या उपक्रमात शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना तसेच मोठ्या संख्येने पुणेकर नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती फाउंडेशनचे संस्थापक पराग मते यांनी आज  पत्रकार परिषदेत दिली.

**<u>बनेश्वर</u>**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर इथल्या,  श्रीक्षेत्र बनेश्वरला येत्या रविवारी,  महाशिवरात्री दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे, बनेश्वर देवस्थानातर्फे  व्यापक तयारी सुरू करण्यात आली आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी मंदिरातील शासकीय महापूजा मध्यरात्री साडेबारापर्यंत पार पडणार असून, त्यानंतर पहाटे सहा वाजेपर्यंत भाविकांना अभिषेक करता येणार आहे.

महाशिवरात्रीनिमित्त निळकंठेश्वर, घोरावडेश्वर आणि बनेश्वर येथे जाण्यासाठी  पीएमपीएमएल तर्फे नियमित आणि जादा  बस गाड्यांचे आयोजन करण्यात आले आहे. कात्रज सर्पोद्यान ते बनेश्वर, स्वारगेट ते निळकंठेश्वर पानशेत आणि पवळे चौक निगडी ते घोरवडेश्वर शंकरवाडी या मार्गावर बस धावणार आहेत.

**<u>ICAIअध्यक्ष</u>**

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या २०२६-२७ या वर्षासाठीच्या नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच नवी दिल्लीत झाली. कार्यकारिणीच्या  अध्यक्षपदी सनदी लेखापाल  प्रसन्न कुमार डी. तर उपाध्यक्षपदी सनदी लेखापाल  मंगेश किनारे यांची निवड करण्यात आली आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल ३२ आणि किमान १४ पूर्णांक ४ दशांश  अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र होतं. उद्या देखील अशाच स्वरूपाचं हवामान असण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**